# Education
## Paper III
# शिक्षाशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. In case of Shantiniketan Gurudeo Tagore seems to be more inspired by :
   - (A) Idealism and naturalism
   - (B) Idealism and pragmatism
   - (C) Naturalism and pragmatism
   - (D) Pragmatism and existentialism

2. Four purusharthas in Indian philosophy are :
   - (A) Dharma, Artha, Vairagya, Moksha
   - (B) Dharma, Artha, Kama, Moksha
   - (C) Vairagya, Moksha, Shanti, Ahimsa
   - (D) Satya, Shanti, Ahimsa, Vairagya

1. शांतिनिकेतन संदर्भात गुरुदेव टागोर............. 'मुळे अधिक प्रभावित झालेले दिसतात.
   - (A) आदर्शवाद आणि निसर्गवाद
   - (B) आदर्शवाद आणि कार्यवाद
   - (C) निसर्गवाद आणि कार्यवाद
   - (D) कार्यवाद आणि अस्तित्ववाद

2. भारतीय तत्वज्ञानातील चार पुरुषार्थ खालील-प्रमाणे आहेत :
   - (A) धर्म, अर्थ, वैराग्य, मोक्ष
   - (B) धर्म, अर्थ, काम, मोक्ष
   - (C) वैराग्य, मोक्ष, शांती, अहिंसा
   - (D) सत्य, शांती, अहिंसा, वैराग्य

3. Rousseau expected :

(A) External discipline

(B) Internal discipline

(C) Social discipline

(D) Discipline through natural consequences

4. Educational philosophy primarily decides................................of education.

(A) Aims and objectives

(B) Curriculum

(C) Methodology of teaching

(D) Evaluation procedures

5. In Right to Education Act, 2009, the proposed pupil-teacher ratio is :

(A) 25 : 1

(B) 35 : 1

(C) 30 : 1

(D) 20 : 1

3. रूसोला.........................अपेक्षित होती.

(A) बाह्य शिस्त

(B) आंतरिक शिस्त

(C) सामाजिक शिस्त

(D) नैसर्गिक परिणामांमधून शिस्त

4. शैक्षणिक तत्वज्ञान हे प्रामुख्याने शिक्षणाबाबत ...................ठरविते.

(A) ध्येये आणि उद्दिष्टे

(B) अभ्यासक्रम

(C) अध्यापन पद्धती

(D) मूल्यमापन पद्धती

5. शिक्षणाचा हक्क कायदा-2009 नुसार विद्यार्थी-शिक्षक प्रमाण......................आहे.

(A) 25 : 1

(B) 35 : 1

(C) 30 : 1

(D) 20 : 1

6. For promoting women education, Maharashtra Govt. started :

   (A) Jijamata Free Education Scheme
   (B) Savitribai Phule Dattak Palak Yojana
   (C) Indira Gandhi Free Vocational Education Scheme
   (D) Pandita Ramabai Shikshan Yojana

7. 'DPEP' means :

   (A) Digital Primary Education Programme
   (B) District Primary Evaluation Programme
   (C) District Product in Education Programme
   (D) District Primary Education Programme

6. स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने.....................योजना सुरू केली.

   (A) जिजामाता मोफत शिक्षण योजना
   (B) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना
   (C) इंदिरा गांधी मोफत व्यवसाय शिक्षण योजना
   (D) पंडिता रमाबाई शिक्षण योजना

7. 'डीपीईपी' म्हणजे..............................

   (A) डिजीटल प्राथमिक शिक्षण कार्यक्रम
   (B) जिल्हा प्राथमिक मूल्यमापन योजना
   (C) जिल्हा शिक्षण उत्पाद योजना
   (D) जिल्हा प्राथमिक शिक्षण योजना

8. The main aim of National Adult Education Programme is to teach the............................years old adults.

(A) 16 to 44

(B) 15 to 35

(C) 13 to 36

(D) 18 to 45

9. A child sits before he walks and walks before he runs. Thus the process of development is :

(A) Continuous

(B) General to specific

(C) Specific to every individual

(D) Sequential

10. The *correct* sequence of stages is creative thinking is :

(A) Preparation → incubation → illumination → verification

(B) Incubation → preparation → illumination → verification

(C) Preparation → incubation → verification → illumination

(D) Incubation → preparation → verification → illumination

8. राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे मुख्य ध्येय ......................वयोगटातील लोकांना शिकवायचे आहे.

(A) 16 ते 44

(B) 15 ते 35

(C) 13 ते 36

(D) 18 ते 45

9. लहान मूळ चालू लागण्यापूर्वी बसायला लागते व धावण्यापूर्वी चालायला लागते, यावरून विकास प्रक्रिया.........................

(A) सातत्याने होते

(B) स्थूळाकडून सूक्ष्माकडे प्रगत होते

(C) प्रत्येक व्यक्तिनुसार बदलते

(D) विशिष्ट क्रमाने होते

10. सृजनशील विचारप्रक्रियेचा अचूक क्रम ............................आहे.

(A) सिद्धता → उबवणे → स्फूर्ती घेणे → निकषण

(B) उबवणे → सिद्धता करणे → स्फूर्ती घेणे → निकषण

(C) सिद्धता → उबवणे → निकषण → स्फूर्ती घेणे

(D) उबवणे → सिद्धता → निकषण → स्फूर्ती घेणे

11. Total personality of an individual can be represented by :

(A) Heredity × Environment

(B) Heredity + Environment

(C) Heredity × Development

(D) Heredity + Development

12. ..........................are the two basic types of Intelligence tests.

(A) Aptitude and Achievement Tests

(B) Criterion and Norm Referenced Tests

(C) Individual and Group Tests

(D) Binet and Wechsler Tests

13. The first intelligence test was developed to :

(A) To distinguish children who need special education from those who were having behavioural problems

(B) To distinguish children who were gifted from those who were retarded

(C) To compare French students to American students

(D) To compare French students to German students

11. एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व........................ने निर्देशित करता येते.

(A) अनुवंश × परिस्थिती

(B) अनुवंश + परिस्थिती

(C) अनुवंश × विकास

(D) अनुवंश + विकास

12. ..........................ह्या दोन मूलभूत प्रकारच्या बुद्धिमापन कसोट्या आहेत.

(A) अभियोग्यता व संपादणूक कसोट्या

(B) निकष संदर्भीय व प्रमाण संदर्भीय कसोट्या

(C) वैयक्तिक व सामूहिक कसोट्या

(D) बीने व वेश्लर कसोट्या

13. पहिली बुद्धिमापन कसोटी तयार करण्याचे कारण :

(A) विशेष शिक्षणाची गरज असलेली मुले व वर्तनाशी संबंधित असलेल्या समस्याप्रधान मुले यांच्यात भेद करण्यासाठी

(B) प्रज्ञावंत व मतिमंद मुले यांच्यातले फरक जाणण्यासाठी

(C) फ्रेंच व अमेरीकन विद्यार्थ्यांची तुलना करण्यासाठी

(D) फ्रेंच व जर्मन विद्यार्थ्यांची तुलना करण्यासाठी

14. In Pavlov's experiments with a dog, the bell was the :
   (A) Conditioned response
   (B) Unconditioned stimulus
   (C) Conditioned stimulus
   (D) Unconditioned response

15. ........................has given importance to hierarchical steps in learning. Learning at higher level does not take place unless learning at lower level is achieved.
   (A) Bruner
   (B) Ausubel
   (C) Gagne
   (D) Skinner

16. Sarika who is hearing impaired worked hard to win a prize in drawing. This is an example of :
   (A) Compensation
   (B) Rationalization
   (C) Identification
   (D) Sublimation

14. पॉव्हलॉव्हच्या कुत्र्याच्या प्रयोगात बेळ (घंटानाद) हा............................होता.
   (A) अभिसंहित प्रतिसाद
   (B) अभिसंहित नसलेला (नैसर्गिक) चेतक
   (C) अभिसंहित चेतक
   (D) अभिसंहित नसलेला (नैसर्गिक) प्रतिसाद

15. ......................यांनी अध्ययनासाठी विशिष्ट असा पायऱ्यांचा चढता क्रम महत्वाचा मानला. खालच्या पातळीवर अध्ययन झाल्याशिवाय वरच्या पातळीवर जाता येत नाही.
   (A) ब्रूनर
   (B) आसुबेल
   (C) गॅने
   (D) स्किनर

16. कर्णबधिर सारिकाने अतिशय प्रयत्न करून चित्रकलेचे बक्षिस मिळविले हे...................... या संरक्षण यंत्रणेचे उदाहरण आहे.
   (A) प्रतिपूरण
   (B) कृतकसमर्थन
   (C) तादात्म्य
   (D) उदात्तीकरण

17. Rahul failed in the X Std. exam. He told his friends that his parents did not send him to coaching classes. This is an example of :

(A) Repression

(B) Compensation

(C) Rationalization

(D) Projection

18. Which of the following is *not* related to guidance service ?

(A) It is a continuous process

(B) It serves developmental needs

(C) It is related to particular problem

(D) It helps the person in making decisions

19. Amit never finishes his homework on time. His need for guidance is :

(A) Educational

(B) Vocational

(C) Personal

(D) Social

17. राहुल 10वी च्या परीक्षेत नापास झाला. त्याने त्याच्या मित्रांना सांगितले कि त्याच्या पालकांनी त्याला 'मार्गदर्शन वर्गाला' पाठविले नव्हते. हे.........................चे उदाहरण आहे.

(A) दमन

(B) प्रतिपुरण

(C) समर्थन

(D) प्रक्षेपण

18. खालीलपैकी कोणते विधान मार्गदर्शन सेवेशी संबंधित **नाही** ?

(A) ही अखंड प्रक्रिया आहे

(B) ह्यामुळे विकासात्मक गरजा पूर्ण होतात

(C) ही सेवा विशिष्ट समस्येशी निगडित आहे

(D) ही सेवा व्यक्तीला निर्णय घेण्यास मदत करते

19. अमित त्याचा गृहपाठ कधीच वेळेत पूर्ण करत नाही. मार्गदर्शनासाठीची त्याची गरज ही .................आहे.

(A) शैक्षणिक

(B) व्यावसायिक

(C) वैयक्तिक

(D) सामाजिक

20. Which of the following statements of a teacher, in class will have detrimental effect on students self-concept ?
    (A) I guess you didn't study properly.
    (B) You are very lazy. Look at others.
    (C) You put little extra time for study.
    (D) I know you can do better.

21. In secondary education the focus of guidance is on :
    (A) Adjustment to school environment
    (B) Development of socially desirable behaviour
    (C) Selecting career path
    (D) Identifying individual differences

20. शिक्षकाच्या पुढीलपैकी कोणत्या विधानाचा, विद्यार्थ्यांच्या स्व-संकल्पनेवर नकारात्मक प्रभाव पडेल ?
    (A) मला वाटते, तू योग्य प्रकारे अभ्यास केला नाहीस.
    (B) तू खूप आळशी आहेस. जरा इतरांकडे पहा.
    (C) अभ्यासासाठी तू जरा जास्त वेळ दे.
    (D) मला माहित आहे तू आणखी चांगली कामगिरी करू शकतोस.

21. माध्यमिक स्तरावर मार्गदर्शनाचा केंद्रबिंदू ........................ हा असतो.
    (A) शालेय वातावरणाशी समायोजन
    (B) समाजाला अपेक्षित वर्तनाचा विकास
    (C) व्यवसाय मार्गाची निवड
    (D) वैयक्तिक फरकांची ओळख

22. A null hypothesis stands rejected at 0.01 level of significance. It will be :

(A) rejected at 0.5 level of significance

(B) accepted at 0.5 level of significance

(C) rejected at 0.05 level of significance

(D) accepted at 0.05 level of significance

23. A research is planned to study 'health education components in the science textbook of VI standard'. ..........................tool will *not* be used to collect necessary data in this research.

(A) Achievement test

(B) Questionnaire

(C) Content analysis

(D) Rating scale

22. एका शून्य परिकल्पनेचा 0.01 सार्थकता स्तरावर त्याग केला जातो. त्या शून्य परिकल्पनेचा :

(A) 0.5 सार्थकता स्तरावर त्याग होईल

(B) 0.5 सार्थकता स्तरावर स्वीकार होईल

(C) 0.05 सार्थकता स्तरावर त्याग होईल

(D) 0.05 सार्थकता स्तरावर स्वीकार होईल

23. एका संशोधनात, 'इयत्ता सहावीच्या विज्ञान पाठ्यपुस्तकातील आरोग्य शिक्षणाचे घटक' असा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. या संशोधनासाठी आवश्यक माहिती (data) संकलित करताना ........................साधन वापरले जाणार **नाही**.

(A) संपादन कसोटी

(B) प्रश्नावली

(C) आशय विश्लेषण

(D) पदनिश्चयन श्रेणी

24. "The children having more creativity are more active than children having less creativity."

What kind of hypothesis is the above statement ?

(A) Null hypothesis

(B) Directional hypothesis

(C) Non-directional hypothesis

(D) Statistical hypothesis

25. The advantage of incidental sampling is :

(A) It is easy for statistical calculations

(B) It is available easily

(C) It gives accurate results

(D) It represents the population appropriately

24. ''जास्त सृजनशील मुले कमी सृजनशील मुलांपेक्षा अधिक क्रियाशील असतात.''

प्रस्तुत विधान कोणत्या प्रकारची परिकल्पना आहे ?

(A) शून्य परिकल्पना

(B) दिशादर्शक परिकल्पना

(C) अदिशादर्शक परिकल्पना

(D) संख्याशास्त्रीय परिकल्पना

25. प्रासंगिक न्यादर्शाचा फायदा........................हा होय.

(A) तो संख्याशास्त्रीय आकडेमोडीसाठी सुलभ असतो

(B) तो सहजगत्या उपलब्ध होतो

(C) त्याचे निष्कर्ष अचूक येतात

(D) तो जनसंख्येचे योग्य प्रतिनिधीत्व करतो

26. When a research deals with culture of a group of people, the research is called :

(A) Sociological research

(B) Orientational research

(C) Phenomenological research

(D) Ethnographic research

27. ..................................is a threat to external experimental validity.

(A) Maturation

(B) Statistical regression

(C) Unstable instrumentation

(D) Interference of prior treatment

28. ..............................is a characteristic that distinguishes descriptive research from assessment and evaluation.

(A) Hypothesis formulation

(B) Hypothesis testing

(C) Development of generalization

(D) Analysis of the relationships between non-manipulated variables

26. लोकसमूहाच्या संस्कृतीशी संबंधित संशोधनास ...........................म्हणतात.

(A) समाजशास्त्रीय (Sociological) संशोधन

(B) विशिष्ट विचारानुसारी (Orientational) संशोधन

(C) घटनाविज्ञानात्मक (Phenomenological) संशोधन

(D) मानववंशशास्त्रीय (Ethnographic) संशोधन

27. प्रयोगाच्या बाह्य सप्रमाणतेला.......................चा धोका असतो.

(A) परिपक्वता

(B) सांख्यिकिय परागमन

(C) अस्थिर साधनसामुग्री

(D) पूर्वीच्या उपचारांमुळे झालेला हस्तक्षेप

28. मूल्यांकन आणि मूल्यमापन यापेक्षा............. या वैशिष्ट्याबाबतीत वर्णनात्मक संशोधन वेगळे असते.

(A) परिकल्पना तयार करणे

(B) परिकल्पना परीक्षण

(C) सामान्यीकरणांचे विकसन

(D) फेरफार न केलेल्या चलांमधील संबंधाचे विश्लेषण

29. Factorial design is necessary when more than at least......................... independent variable/s is/are included in the experiment.

(A) One

(B) Two

(C) Three

(D) Four

29. प्रयोगामध्ये जेंव्हा कमीत कमी..................... पेक्षा जास्त स्वाश्रयी चल/चले समाविष्ट केलेली असतात तेंव्हा घटकात्मक अभिकल्प आवश्यक ठरतो.

(A) एक

(B) दोन

(C) तीन

(D) चार

30. .............................introduced the first draft of a Law for Compulsory Education for age group of 6-10 in India.

(A) Mahatma Gandhi

(B) Gopal Krishna Gokhale

(C) Gopal Ganesh Agarkar

(D) Macaulay

30. भारतात 6 ते 10 या वयोगटासाठी सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याचा पहिला आराखडा .........................यांनी मांडला.

(A) महात्मा गांधी

(B) गोपाळ कृष्ण गोखले

(C) गोपाळ गणेश आगरकर

(D) मेकॉले

31. The main characteristic of Open Universities is :

(A) it gives flexibilities in selection of courses

(B) simple examination system

(C) it has direct communication

(D) it has supported by Govt.

31. मुक्त विद्यापीठाचे मुख्य वैशिष्ट्य..............हे आहे.

(A) हे अभ्यासक्रम निवडीला स्वातंत्र्य देते

(B) याची परीक्षा पद्धती सोपी आहे

(C) यात प्रत्यक्ष संवाद असतो

(D) याला शासनाकडून सहाय्य असते

32. ..............................gave the idea of Open University in 1963 in Britain.

(A) Harold Wilson

(B) W. A. Grundy

(C) Thomas Peters

(D) Jack Foks

33. The content of curriculum must satisfy :

(A) need of the learners

(B) objectives of the curriculum

(C) parents aspirations

(D) government's policies

34. ..........................is *not* the method of curriculm development.

(A) The concentric method

(B) The topical method

(C) The patch method

(D) The analytical method

32. ब्रिटन मध्ये 1963 साली........................याने मुक्त विद्यापीठाची कल्पना मांडली.

(A) हॅरॉल्ड विल्सन

(B) डब्ल्यू. ए. ग्रुंडी

(C) थॉमस पीटर्स

(D) जॅक फॉक्स

33. अभ्यासक्रमातील आशयाने........................चे समाधान केले पाहिजे.

(A) अध्ययनार्थीच्या गरजा

(B) अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

(C) पालकांच्या आकांक्षा

(D) शासनाची धोरणे

34. ..............................ही अभ्यासक्रम विकसनाची पद्धती **नाही**.

(A) समकेंद्री पद्धती

(B) घटक पद्धती

(C) तुकडे पद्धती

(D) पृथक्करण पद्धती

35. In emerging Indian society curriculum making is democratic process and should provide for :

(A) students participation

(B) social participation

(C) govt. participation

(D) inclusive participation

36. Scientific Management was introduced by :

(A) F. W. Taylor

(B) Robert Owen

(C) Adam Smith

(D) Charles Babbage

37. The main principle of Laissez-faire style of leadership is :

(A) Leader control the group

(B) Leader gives direction to the group

(C) Leader takes decision on his own

(D) Leader gives full freedom to group

35. उदयोन्मुख भारतामध्ये अभ्यासक्रम विकसनाची प्रक्रिया लोकशाहीयुक्त असावी व तिने ......................कडे लक्ष पुरवावे.

(A) विद्यार्थांचा सहभाग

(B) समाजाचा सहभाग

(C) शासनाचा सहभाग

(D) सर्वसमावेशित सहभाग

36. शास्त्रीय व्यवस्थापनाचा परिचय प्रथम.......... ने करून दिला.

(A) एफ. डब्ल्यू. टेलर

(B) रॉबर्ट ओवेन

(C) ॲडम स्मिथ

(D) चार्लस् बॅबेज

37. नेतृत्वाच्या 'बंधन मुक्त शैलीं'चे मुख्य तत्व ........................आहे.

(A) नेता गटावर नियंत्रण ठेवतो

(B) नेता गटाला दिग्दर्शन करतो

(C) नेता स्वत:च निर्णय घेतो

(D) नेता गटाला पूर्ण स्वातंत्र्य देतो

38. ........................has given fourteen principles of modern management.

(A) Henry Fayol

(B) F. W. Taylor

(C) Max Weber

(D) Follett

39. ...........................is a barrier in educational management.

(A) Group spirit

(B) Forecasting

(C) Lack of humane attitude

(D) Self-management

40. "Technical skills, Human skills and Conceptual skills are required for effective supervision", was stated by :

(A) Katz

(B) Adams and Dickey

(C) Harris

(D) Burton and Bruckner

38. आधुनिक व्यवस्थापनाची चौदा तत्वे............ याने सांगितली आहेत.

(A) हेन्री फेयॉल

(B) एफ. डब्ल्यू. टेलर

(C) मॅक्स वेबर

(D) फॉलेट

39. शैक्षणिक व्यवस्थापनात.......................... हा घटक अडथळा निर्माण करतो.

(A) संघ भावना

(B) भविष्य काळाचा वेध

(C) मानवतावादी दृष्टीकोनाचा अभाव

(D) स्व-व्यवस्थापन

40. प्रभावी पर्यवेक्षणासाठी तांत्रिक कौशल्ये, मानवी कौशल्ये आणि संकल्पनात्मक कौशल्यांची आवश्यकता आहे. हा विचार.................... यांनी दिला.

(A) काट्ज

(B) ॲडम्स आणि डीकी

(C) हारीस

(D) बरटन आणि ब्रुकनर

41. The book on 'The Principles of Scientific Management' is written by :

(A) F. W. Taylor

(B) Henry Fayol

(C) Kurt Lewin

(D) Elton Mayo

42. Opening Ashramshala in society is....................approach of educational planning.

(A) Social Justice Approach

(B) Social Demand Approach

(C) Manpower Planning Approach

(D) Rate of Returns Approach

43. ..........................is *not* the management principle given by Henry Fayol.

(A) Distribution of work

(B) Unity of Command

(C) Discipline

(D) Punishment to employee

41. 'द प्रिन्सिपल ऑफ साइंटीफिक मॅनेजमेंट' हे पुस्तक........................यांनी लिहिले.

(A) एफ. डब्ल्यू. टेलर

(B) हेन्री फेयॉल

(C) कुर्ट लेविन

(D) इल्टन मायो

42. समाजात आश्रमशाळा सुरू करणे हा शैक्षणिक नियोजनाचा........................उपागम आहे.

(A) सामाजिक न्याय उपागम

(B) सामाजिक मागणी उपागम

(C) मनुष्यबळ नियोजन उपागम

(D) रेट ऑफ रिटर्न उपागम

43. हेन्री फेयॉलने सांगितलेल्या व्यवस्थापनाच्या तत्वामध्ये......................हे तत्व **नाही**.

(A) कार्यभाराचे वाटप

(B) आदेशातील एकवाक्यता

(C) शिस्त

(D) कर्मचाऱ्यांना शिक्षा

44. T-scores can be obtained by multiplying the Z scores by................. and by adding the product to...........

(A) 5, 50

(B) 10, 50

(C) 50, 5

(D) 50, 10

45. Creativity can rarely be tested through....................type of questions.

(A) Essay

(B) Short answer

(C) Multiple choice

(D) Letter writing

46. In the SSC Examination Marklist, if the state average mark is given by the side of student's marks, it denotes :

(A) Range

(B) Norm

(C) Achievement

(D) Performance

44. Z गुणांकाला......................ने गुणून आलेल्या गुणाकारात................मिळवून, T-गुणांक काढता येतो.

(A) 5, 50

(B) 10, 50

(C) 50, 5

(D) 50, 10

45. सृजनशीलता ही क्वचितच......................... प्रकारच्या प्रश्नांद्वारे तपासली जाते.

(A) निबंधवजा

(B) लघुत्तरी

(C) बहुपर्यायी

(D) पत्र-लेखन

46. माध्यमिक शाला प्रमाणपत्र परीक्षेच्या गुणपत्रिकेत जर विद्यार्थ्यांच्या गुणांच्या बाजूला राज्याचे सरासरी गुण दिले असल्यास, ते......................दर्शवितात.

(A) विस्तार

(B) प्रमाणक

(C) संपादन

(D) कार्यमान

47. The set of questions 'Census enumerators' ask, is from a................. interview schedule.

(A) Structured

(B) Unstructured

(C) Flexible

(D) Open

48. The flexibility to penetrate beyond initial answers and redirect the enquiry more fruitfully is possible in :

(A) Structured interview

(B) Unstructured interview

(C) Formal interview

(D) Structured and formal interview

49. ................................is estimated on the basis of item relevance in educational achievement tests.

(A) Content validity

(B) Predictive validity

(C) Face validity

(D) Operational validity

47. 'जनगणना करणारा' विविध प्रश्न विचारतो, ही............................प्रकारची मुलाखत सूची आहे.

(A) संरचित

(B) असंरचित

(C) लवचिक

(D) मुक्त

48. सुरवातीला दिलेल्या उत्तरांच्या पलिकडे जाऊन माहिती मिळविण्यासाठी लवचिकता असणे आणि मुलाखत यशस्वी बनविण्यासाठी पुनर्रचना करणे ही बाब......................मध्ये शक्य असते.

(A) संरचित मुलाखत

(B) असंरचित मुलाखत

(C) औपचारिक मुलाखत

(D) संरचित आणि औपचारिक मुलाखत

49. शैक्षणिक संपादन कसोट्यामध्ये...................... चे निर्धारण प्रश्नाच्या समर्पकतेच्या आधारे केले जाते.

(A) आशय सप्रमाणता

(B) भाकितात्मक सप्रमाणता

(C) दर्शनी सप्रमाणता

(D) कार्यात्मक सप्रमाणता

50. The raw scores of two students in Mathematics are same; however Z scores are different. It is because of :

(A) Difference in median values

(B) Difference in T values

(C) Difference in quartile deviation values

(D) Difference in mean values

51. In order to avoid measurement error, the test should be free from :

(A) Objectivity

(B) Ambiguity

(C) Specificity

(D) Clarity

50. दोन विद्यार्थ्यांचे गणितातील गुण (कच्चे) सारखे आहेत, तथापि त्यांच्या Z गुणांकात फरक आहे. याचे कारण असे की :

(A) मध्यगेच्या मूल्यांतील फरक

(B) T मूल्यांतील फरक

(C) चतुर्थक विचलनातील मूल्यांचा फरक

(D) मध्यमानाच्या मूल्यांतील फरक

51. मापनत्रुटी टाळण्यासाठी कसोटी ही................ पासून मुक्त असावी.

(A) वस्तुनिष्ठता

(B) संदिग्धता

(C) विशिष्टता

(D) स्पष्टता

52. When we use various principles, formulae, rules which are derived from education to solve some problems in education, then this study is called :

(A) Educational Technology

(B) Technology of Education

(C) Technology in Education

(D) Technological Education

53. In systems approach.................. approach is used.

(A) Analytic

(B) Mathetic

(C) Wholistic

(D) Humanistic

54. Teacher selects the media to explain the content at the........................stage of teaching.

(A) Interactive

(B) Pre-active

(C) Post-active

(D) Intermediate

52. शिक्षणातील विविध समस्या सोडविण्यासाठी ज्यावेळी आपण शिक्षणातील विविध तत्वे, सूत्रे, नियम यांचा उपयोग करतो त्यावेळी त्या अभ्यासास.........................म्हणतात.

(A) शैक्षणिक तंत्रविज्ञान

(B) शिक्षणाचे तंत्रविज्ञान

(C) शिक्षणातील तंत्रविज्ञान

(D) तंत्रविज्ञानात्मक शिक्षण

53. प्रणाली उपागमामध्ये........................उपागमाचा उपयोग केला जातो.

(A) विश्लेषणात्मक

(B) मॅथेटिक

(C) समाकारवादी

(D) मानवतावादी

54. शिक्षक आशय स्पष्ट करण्यासाठी माध्यमाची निवड अध्यापनाच्या........................अवस्थेमध्ये करतात.

(A) आंतरक्रियात्मक

(B) पूर्वावस्था

(C) उत्तरावस्था

(D) मध्यावस्था

55. Child learns letters of alphabet in the Kindergarten taught by teachers. This is the........................level of teaching.

(A) Conditioning

(B) Memory

(C) Understanding

(D) Reflective

56. ..........................are the components of micro-teaching.

(A) Modelling, feedback, set, integration of skills

(B) Planning, teaching, reteaching, discussion

(C) Planning, teaching, feedback, reteaching

(D) Orientation, discussion, planning, execution

55. किंडरगार्टनमध्ये मूल शिक्षकाने शिकविलेली भाषेतील अक्षरे शिकते. ही अध्यापनाची ..........................पातळी होय.

(A) अभिसंधान

(B) स्मृती

(C) आकलन

(D) विमर्शी चिंतन

56. ............................हे सूक्ष्म अध्यापनाचे घटक आहेत.

(A) आदर्शीकरण, प्रत्याभरण, मांडणी, कौशल्यांचे संघीकरण

(B) नियोजन, अध्यापन, पुनर्अध्यापन, चर्चा

(C) नियोजन, अध्यापन, प्रत्याभरण, पुनर्अध्यापन

(D) उद्‌बोधन, चर्चा, नियोजन, अंमलबजावणी

57. ..........................method is one of the simulation methods.

(A) Case

(B) Brain-storming

(C) Dramatization

(D) Discussion

58. ..........................is the highest level of objective in psycho-motor domain.

(A) Immitation

(B) Manipulation

(C) Articulation

(D) Naturalization

59. ......................is the pre-requisite condition for teaching.

(A) Student

(B) Content

(C) Face to face communication

(D) Teacher

57. ..........................ही अभिरूप अध्यापन पद्धती-पैकी एक पद्धती आहे.

(A) केस (case)

(B) बुद्धिमंथन पद्धती

(C) नाट्यीकरण

(D) चर्चा मेथड

58. क्रियात्मक क्षेत्रातील..............................हे उच्चतम उद्दिष्ट आहे.

(A) अनुकरण

(B) क्रिया-कौशल्य

(C) संधीकरण

(D) स्वाभाविकीकरण

59. अध्यापन क्रिया होण्यासाठी........................ही पूर्व अट असते.

(A) विद्यार्थी

(B) आशय

(C) समोरासमोर संप्रेषण

(D) शिक्षक

60. The history of special education can be presented as follows :

(A) Mainstreaming → integration → inclusion

(B) Integration → inclusion → mainstreaming

(C) Inclusion → mainstreaming → integration

(D) Inclusion → integration → mainstreaming

61. Learning disability is the term for :

(A) Children with minor or temporary difficulties in learning

(B) Discrepancy between ability and achievement

(C) Children with mental retardation, sensory impairment and emotional disturbances

(D) Children with lack of opportunity to learning

60. 'विशेष शिक्षणाचा' इतिहास खालील प्रमाणे दिसतो :

(A) मुख्य प्रवाह → एकात्मिक → सर्वसमावेशक

(B) एकात्मिक → सर्वसमावेशक → मुख्य प्रवाह

(C) सर्वसमावेशक → मुख्य प्रवाह → एकात्मिक

(D) सर्वसमावेशक → एकात्मिक → मुख्य प्रवाह

61. अध्ययन अक्षम विद्यार्थी म्हणजे.................... होय.

(A) अध्ययनामध्ये अल्प किंवा तात्कालिक अडचण असणारा

(B) क्षमता आणि संपादन यामध्ये भेद असणारा

(C) मतिमंदत्व, संवेदनात्मक दोष आणि भावनिक असंतुलन असणारा

(D) अध्ययन संधीपासून वंचित असणारा

62. Integrated education means :

(A) To integrate learning and teaching

(B) To integrate methodology and content

(C) To integrate disabled children with non-disabled children

(D) To integrate children in special schools

63. The use of........................method is most useful to hearing impairment children.

(A) Use of non-verbal signs

(B) Total communication

(C) Use of visuals

(D) Listening skills training

62. एकात्मिक शिक्षण म्हणजे....................होय.

(A) अध्ययन व अध्यापनाचे एकात्मिकरण

(B) आशय व अध्यापनाचे एकात्मिकरण

(C) क्षमताप्राप्त व अक्षम विद्यार्थ्यांचे एकात्मिकरण

(D) विशेष शाळेत विद्यार्थ्यांचे एकात्मिकरण

63. कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी..............................ही पद्धत सर्वात उपयुक्त ठरते.

(A) खाणाखुणांचा (करपळ्ळवीचा) वापर करणे

(B) संपूर्ण संपर्क पद्धतीचा वापर करणे

(C) दृश्य-सामग्रीचा वापर करणे

(D) श्रवण कौशल्याचे प्रशिक्षण घेणे

64. ........................., is the effective way for the development of mentally retarded students.

(A) Developing reading habits of pictorial books

(B) Giving emphasis on learning through activity

(C) Finding out the drawbacks and rectifying it

(D) Arithmetic and spelling practice

65. The moderately mentally retarded students are :

(A) neither educable nor trainable

(B) they are educable but not trainable

(C) they are not educable but are trainable

(D) they are educable and trainable

64. मंदबुद्धी (MR) विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शिक्षकानी केलेला प्रभावी उपाय................ आहे.

(A) चित्रांकीत पुस्तके वाचनाची आवड वाढविणे

(B) कृतिप्रधान अध्ययनावर भर देणे

(C) या विद्यार्थ्यांमधील दोष शोधून उपचार करणे

(D) अंकगणित, स्पेळींग यांचे पाठांतर करून घेणे

65. मध्यममतिमंद विद्यार्थी :

(A) शिक्षण घेऊ शकत नाहीत वा प्रशिक्षण घेऊ शकत नाहीत

(B) शिक्षण घेऊ शकतात पण प्रशिक्षण घेऊ शकत नाहीत

(C) शिक्षण घेऊ शकत नाहीत पण प्रशिक्षण घेऊ शकतात

(D) शिक्षण घेऊ शकतात आणि प्रशिक्षण ही घेऊ शकतात

66. ..........................is a trait of Gifted Learners.

(A) These learners are good players

(B) These students are more hyperactive

(C) These students are more curious

(D) These students try to focus attention on several things at a time

67. Ability grouping is most suitable for :

(A) Hearing impaired

(B) Gifted

(C) Visually impaired

(D) Physically handicapped

68. Training through microteaching is based on :

(A) Knowledge acquisition approach

(B) Comprehension approach

(C) Skill approach

(D) Competency approach

66. कुशाग्र बुद्धीच्या विद्यार्थ्याचे......................हे एक लक्षण आहे.

(A) हे विद्यार्थी चांगळे खेळाडू असतात

(B) हे विद्यार्थी चंचल असतात

(C) हे विद्यार्थी अधिक जिज्ञासू असतात

(D) हे विद्यार्थी एकाचवेळी अनेक गोष्टींवर लक्ष देण्याचा प्रयत्न करतात

67. क्षमता गट....................साठी योग्य आहे.

(A) कर्णबधिर

(B) प्रज्ञावंत

(C) दृष्टिहीन

(D) शारीरिक अपंग

68. सूक्ष्माध्यापनाद्वारे प्रशिक्षण हे......................वर आधारित असते.

(A) ज्ञान संपादन उपागम

(B) आकलन उपागम

(C) कौशल्य उपागम

(D) क्षमता उपागम

69. Chattopadhyaya Commissison was established for :
   (A) Universalization of Primary Education
   (B) Vocational Education
   (C) Discussing various aspects of school teachers
   (D) Value Education

70. ............................award is given to the best female teacher in Maharashtra.
   (A) Anutai Wagh
   (B) Anandibai Joshi
   (C) Tarabai Modak
   (D) Savitribai Phule

71. Which of the following is the main principle of National Curriculum Framework, 2005 ?
   (A) Information technology is the soul of education
   (B) The perspective of education should be shifted from rote based transmission to creative type of self-learning
   (C) Education must be highly vocationalised
   (D) Teaching should be based on models of teaching

69. चट्टोपाध्याय कमिशन.....................साठी स्थापन झाले होते.
   (A) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण
   (B) व्यावसायिक शिक्षण
   (C) शालेय शिक्षकांच्या विविध पैलूंवर चर्चा
   (D) मूल्य शिक्षण

70. महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट स्त्री शिक्षिकेला ...............हा पुरस्कार देण्यात येतो.
   (A) अनुताई वाघ
   (B) आनंदीबाई जोशी
   (C) ताराबाई मोडक
   (D) सावित्रीबाई फुले

71. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2005) चे प्रमुख सूत्र कोणते ?
   (A) माहिती तंत्रज्ञान हे शिक्षणाचा आत्मा होय
   (B) शिक्षणाचे स्वरूप हे पाठांतरावर आधारित अध्ययनाकडून सृजनशील स्वयं अध्ययनाकडे असावे
   (C) शिक्षणाचे व्यावसायिकरण होणे अत्यंत आवश्यक आहे
   (D) अध्यापन हे अध्यापनाच्या प्रतिमानावर आधारित असावे

72. The first systematic effort for the in-service education of secondary teachers was initiated with the establishment of :

(A) District Institute of Education and Training

(B) Secondary Board of Teacher Education

(C) Secondary Teacher Education Programme

(D) Extension Education Centres

73. Performance Appraisal of Teachers should be taken up by :

(A) Head of the Institution

(B) Colleagues

(C) Higher authorities from Government

(D) Students

72. माध्यमिक शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाचा पहिला पद्धतशीर प्रयत्न..........................च्या स्थापनेमुळे झाला.

(A) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था

(B) माध्यमिक शिक्षक शिक्षण मंडळ

(C) माध्यमिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम

(D) विस्तार शिक्षण केंद्र

73. शिक्षकांच्या कामगिरीचे मूल्यांकन.................. यांचेकडून केले जावे.

(A) संस्था प्रमुख

(B) सहकारी

(C) शासकीय वरिष्ठ अधिकारी

(D) विद्यार्थी

74. A school really means :

(A) A learning environment created by visionary and creative teachers

(B) A learning environment built by reputed architects and builders

(C) A learning environment imagined by philosophers

(D) A learning environment as required by entrepreneurs

75. The quality of teacher education is to be defined in terms of............... .

(A) time, money, place, utility

(B) objectives, evaluation, implementation, results

(C) excellence, value, knowledge enrichment, educational outcome

(D) schools, colleges, universities, private institutes

74. शाळा ही खऱ्या अर्थाने.......................असते.

(A) दूरदृष्टी आणि सृजनशीलता असणाऱ्या शिक्षकांनी अध्ययनासाठी निर्माण केलेले वातावरण

(B) सुप्रसिद्ध वास्तुविशारदांनी निर्माण केलेले अध्ययनपूरक वातावरण

(C) तत्वज्ञानी व्यक्तींनी निर्माण केलेले अध्ययनपूरक वातावरण

(D) उद्योजकाला आवश्यक असलेले अध्ययनपूरक वातावरण

75. शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता.......................या गोष्टींमधून निश्चित होते.

(A) वेळ, पैसा, स्थळ, उपयुक्तता

(B) उद्दिष्टे, मूल्यमापन, कार्यवाही, निकाल

(C) गुणवत्ता, मूल्ये, ज्ञान समृद्धि, शैक्षणिक परिणाम

(D) शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, खाजगी संस्था

## ROUGH WORK